**सत्र खटला क्र. ८०/२०२३ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**महाराष्ट्र शासन वि. गजानन देवराव रोही व इतर**
**(CNR NO. MHBU20-000649-2023)**

## नि.क्र. ५७ खाली आदेश
## (पारीत दिनांक १० मार्च २०२६)

०१] प्रस्तुत अर्ज अर्जदार – **गजानन देवराव रोही** याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३९ अन्वये पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथील अपराध क्र. २५६/२०२३ कलम ३०२, १२० (ब) भा.दं.वि. खालील गुन्ह्यात नियमित जामीन मिळण्याकामी दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी नामे मनसुबराव देशमुख पोलीस पाटील, सवडद यांनी पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे तोंडी रिपोर्ट दिला की, दिनांक २७.०७.२०२३ रोजी सकाळी ०६.३० वाजता त्यांना गावातील प्रकाश गाडगे यांनी माहिती दिली की, मोहखेड ते सवडद शेत रस्ता, सवडद शिवार येथे शेत रस्त्यावर एका पुरूषाचे प्रेत पडलेले असून तो रक्तबंबाळ स्थितीत पडलेला आहे. त्या माहितीवरून फिर्यादी घटनास्थळी पोहोचल्यावर त्याला एका पुरूषाचे प्रेत आढळले व त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव होऊन रक्ताचा सडा पडलेला दिसला. फिर्यादीच्या रिपोर्टवरून अज्ञात इसमाविरूद्ध गुन्हा नोंदवण्यात आला. तपासादरम्यान एकूण ५ आरोपींना परिस्थिती जन्य पुराव्याच्या आधारावर अटक करण्यात आली. त्यापैकी, दोन आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६९ खाली सोडण्यात आले.

०३] तपासादरम्यान जुन्या भांडणाच्या कारणावरून अर्जदार व इतर आरोपींनी दिनांक २७.०७.२०२३ चे सकाळी ०६.३० वाजताचे पूर्वी कट रचुन चिखली येथून मयत केशव विठोबा भुतेकर याला ऑटोत बसवून आणून सवडद शिवारात डोक्यात दगड टाकून जिवानीशी ठार मारले असे निष्पंन्न झाल्याने अर्जदार व इतर आरोपींविरूद्ध कट रचून हत्या करण्याचा गुन्हा पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे नोंदवण्यात आला.

०४] अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. तुषार काळे

यांनी युक्तिवाद केला की, प्रस्तुत गुन्हा हा अज्ञात व्यक्तींविरूद्ध नोंदवण्यात आलेला असून अर्जदाराचा या गुन्ह्याशी अर्थाअर्थी संबंध नाही. अर्जदाराविरूद्ध सकृत दर्शनी केस सिद्ध होत नाही. आरोपी क्र. १, २ आणि ३ यांचा आपसात कोणताही संबंध नाही. अर्जदाराला दिनांक २७.०७.२०२३ रोजी अटक करण्यात आली असून, अर्जदार हा तुरुंगात खितपत पडलेला आहे. प्रस्तुत प्रकरणाचा तपास हा पूर्ण झालेला असून न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. या प्रकरणात ७ महत्त्वपूर्ण साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे साक्षीदारांवर दबाव आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परिणामी अर्जदाराच्या कोठडीची चौकशी कामी कोणतीही आवश्यकता नाही. दोषारोपपत्र दाखल झाले असून महत्त्वपूर्ण साक्षीदारांची साक्ष नोंदवल्यामुळे परिस्थितीत बदल झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा नव्याने विचार करून अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

**०५]** अर्जदारातर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, अभियोग पक्षाच्या कथेनुसार मयत केशव भुतेकर व आरोपी क्र. १ आणि २ यांच्यात ३० वर्षांपूर्वीचा जुना वाद होता. तथापि सदरहू प्रकरण उभयपक्षात तडजोड झाले असल्याने केशव याला जिवाने मारण्याचे कोणतेही कारण उपस्थित होत नाही. तसेच त्यांच्यात जमिनिवरून वाद असल्याबाबत कोठेही फौजदारी तक्रार, तहसिलदारांकडे अर्ज किंवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित नाही. त्यामुळे जमिनिच्या वादावरून केशव याची हत्या करण्यात आली असे म्हणणे न्यायोचित होत नाही.

**०६]** अर्जदारातर्फे पुढे युक्तिवाद करण्यात आला की, आरोपी क्र. १ व २ हे मृतकासोबत दवाखाण्यात हजर होते, त्यामुळे ते मृतक केशवची हत्या करणे शक्य होत नाही. तसेच भारतीय पुरावा कायद्याचे कलम २७ खाली करण्यात आलेला शोध यात उशिर झालेला आहे. आरोपीच्या बयाणानुसार त्याने कपडे ठेवलेले असल्याचे दिसते, परंतु त्याने कपडे लपवले आहे असे तो बयाणात कोठेही सांगत नाही. या सर्व कारणास्तव कलम २७ भारतीय पुरावा कायद्याच्या आधारे जामीन अर्ज रद्द करणे न्यायोचित होत नाही.

**०७]** अर्जदाराचे विद्वान विधिज्ञाने न्यायालयाचे लक्ष जप्तीच्या वेळेवर आणि आरोपी पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे कोणत्या वेळेस हजर होते यावर केंद्रीत केले व आरोपींचे

बयाण आणि जप्तीची वेळ यामध्ये तफावत असल्याचे दाखवले. या प्रकरणात नमूना घेतलेला नसल्याचे दाखवण्यात आले. त्यानंतर महत्त्वपूर्ण साक्षीदार नंदकीशोर पड्डे याच्या पुराव्यानुसार त्याने आरोपींना व मयत केशव याला मोक्यावर ऑटोने सोडले असे दिसून येत नाही. परिणामी अर्जदाराचा या गुन्ह्याशी संबंध असल्याचे सिद्ध होत नाही. या प्रकरणाचा उलगडा करणारे मोहसीन याचे बयाण नोंदवण्यात आले नसून त्याच्या मोबाईलचा डाटा किंवा त्याचा मोबाईल देखील जप्त करण्यात आलेला नसल्याने परिस्थिती जन्य पुराव्याची साखळी पूर्ण होत नसल्याचे सांगितले. ऑटे ड्रायव्हर आणि डॉक्टरांचे मत यामध्ये भिन्नता असल्याने साक्षीदारांची बयाणे ही बनावट असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५–ब चे प्रमाणपत्र, जप्ती करण्यात आलेली नाही. सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील चेहेरे हे अस्पष्ट असल्याने अर्जदाराने हत्या केली असल्याचे सिद्ध होत नाही.

०८] अर्जदारातर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, मृतकाच्या पत्नीच्या बयाणानुसार तो दिनांक १८.०७.२०२३ पासून घराबाहेर गेला होता. मृतकाला दारूचे व्यसन होते. त्यामुळे त्याची हत्या इतर कोणी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणातील इतर आरोपींना न्यायालयाने जमानतीवर सोडले असल्याने सम न्याय तत्त्वाच्या आधारे अर्जदार जमानत मिळवण्यास पात्र आहे. करिता अर्जदाराला जामिनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०९] याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. एस. पी. हिवाळे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन प्रस्तुत अर्जाला प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी युक्तिवाद केला की, आरोपी क्र. १, २, ३ आणि मयत केशव हे साखरखेर्डा या दिशेने जात असतांना सर्व साक्षीदार आणि सी.सी.टी.व्ही. फुटेज वरून दिसून येते. अर्जदार हा मयतासोबत शेवटच्या क्षणी हजर असल्याने त्याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे प्रथम–दर्शनी दिसून येते. आरोपींनी कट रचून केशव याची दगडाने ठेचून हत्या केली. खुणाचा आरोप हा गंभीर स्वरूपाचा असल्याने अर्जदाराला जामीनावर सोडल्यास तो साक्षीदारांवर दबाव टाकेल व त्यांना फितूर करेल. म्हणून अर्जदारांचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विद्वान सरकारी वकील साहेबांनी विनंती केली.

१०] दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने दोषारोपपत्राची पाहणी करण्यात आली. फिर्याद पाहता १९९४ साली झालेल्या भांडणाच्या कारणावरून आरोपींनी कट रचून केशव याची हत्या केली असल्याचे दिसून येते. या प्रकरणात फिर्यादी मनसुबराव, मयताची पत्नी चांगुणा, मयताची दुसरी पत्नी उषा भुतेकर, मयताची मुलगी अश्वीनी वैराळ, फिर्यादीची दुसरी मुलगी विद्या, मयताचा मुलगा अनंता व सर्वात महत्त्वपूर्ण साक्षीदार नंदकिशोर पट्टे यांची साक्ष नोंदवण्यात आलेली आहे. अभियोग पक्षाच्या कथेनुसार नंदकिशोर पट्टे याने दोन आरोपी व मयत यांना त्याच्या ऑटोने वर्दडा फाट्यावरील शाळेजवळ थांबवण्यास सांगितले. त्याबाबतचा सी.सी.टी.व्ही. फुटेज व नंदकिशोर पट्टे याच्या न्यायालया समोरील बयाणानुसार अर्जदार व इतर आरोपींना या गुन्ह्यात परिस्थिती जन्य पुराव्याच्या आधारे अटक करण्यात आले. तथापि, नंदकिशोर पट्टे याची साक्ष अभियोग पक्षाच्या कथेचे समर्थन करत नाही. याउलट, महत्त्वपूर्ण साक्षीदार व मयताच्या रक्ताच्या नातेवाईकांची साक्ष असे दर्शविते की, मयताला दारूचे व्यसन असल्याने, तो नेहमी बाहेर राहत होता व त्याचा अपघातात मृत्यू झाला असल्याची त्यांना माहिती मिळाली. मयताचे रक्ताचे नातेवाईक केशव याची हत्या झाली असल्याचे नाकारतात. शिवाय नंदकिशोर पट्टे याने अभियोग पक्षाच्या कथेचे समर्थन केले नसल्याने अर्जदार व प्रस्तुत गुन्ह्यातील साखळी पूर्ण होत नाही. साक्षीदार मोहन सिंग याचे बयाण नोंदवण्यात आले नाही. म्हणून या बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

११] या प्रकरणातील महत्त्वपूर्ण साक्षीदारांची साक्ष नोंदवली असल्याने त्यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. या प्रकरणातील इतर आरोपींना जमानतीवर सोडण्यात आलेले आहे. अर्जदार हा अडीच वर्षांपासून तुरूंगाधीन आहे. पुराव्या अभावी अर्जदाराला तुरूंगाधीन ठेवणे न्यायसंगत होत नाही. अर्जदार हा त्याच्या घरातील कर्ता पुरूष आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थिती आणि पुरावा पाहता अर्जदार सशर्त जामीन मिळवण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## – आ दे श –

**०१]** नियमित जामीन अर्ज (नि.क्र. ५७) मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **गजानन देवराव रोही** याला पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथील अपराध क्र. २५६/२०२३, कलम ३०२, १२०(ब) भारतीय दंड संहिता खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०४]** अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०५]** अर्जदाराने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.11 10:47:32 +0530

**सागर कृ मुंगीलवार**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**ठिकाण – मेहकर**
**दिनांक – १०.०३.२०२६**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – १०.०३.२०२६